2765
15.09.2026

संचालनालय लेखा व कोषागार
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
07 SEP 2026
प्राप्त झाले सही.........................

संचालनालय, लेखा व कोषागारे व अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र.सेवाप्र-2026/प्र.क्र.40/कोषा प्रशा-3
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-400 032.
दिनांक :- 07 सप्टेंबर, 2026

वाचा:-

1) वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-2019/प्र.क्र.194/कोषा प्रशा-3, दि.15.12.2021
2) वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-2026/प्र.क्र.40/कोषा प्रशा-3, दि.20.03.2026
3) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र.संलेको-2026/प्रशा.कोषा/कार्या-1/प्र.क्र.1435-अ/अस्थायी पदे/मुदतवाढ/2026-27/860/408, दि.11.08.2026
4) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-2016/प्र.क्र.8/16/आ.पु.क.,दि.31.08.2026

## शासन निर्णय

वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.1 येथील शासन निर्णयान्वये लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयासाठी सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक 2 येथील शासन निर्णयान्वये संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना दि.01.03.2026 ते दि.31.08.2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर अस्थायी पदांना दिलेली मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने आता सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या **एकूण 1698 अस्थायी पदांना दि.01.09.2026 ते दि.28.02.2027** या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. यासाठी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षांखालील आर्थिक वर्ष सन 2026-2027 या वित्तीय वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

55

हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-2016/प्र.क्र.8/16/आ.पु.क., दि.31.08.2026 अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by
Tanuja Suresh Maskare
Date: 07-09-2026
13:19:38

( त.सु.मस्करे )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र: परिशिष्ट-अ

प्रत,

*१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- 1. महाराष्ट्र, मुंबई (पाच प्रती)
*२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- 2. महाराष्ट्र, नागपूर (पाच प्रती )
३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
*4. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

7/9
श्रीम. मांगले
Kadam 15/9/26

01758/2026/2332
10.9.2026

*५. सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे
*६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
*७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
*८. सर्व कोषागार अधिकारी/सर्व उपकोषागार अधिकारी
९. कक्ष अधिकारी, प्रशासन 4, अर्थसंकल्प 7, आ.पु.क., वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती कोषा प्रशा-3.
(* संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

## परिशिष्ट-अ

**लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील दि.01.09.2026 ते दि.28.02.2027 पर्यंत मुदतवाढ मिळणेसाठीची अस्थायी पदे दर्शविणारे एकत्रित गोषवारा विवरणपत्र**

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (नियमित, नवीन पदसंख्या) |
|---|---|---|---|
| 1 | अ | सह संचालक/ अधिदान व लेखा अधिकारी | 09 |
| 2 | अ | उपसंचालक/ कोषागार अधिकारी (संवर्ग उपसंचालक)/उप अधिदान व लेखा अधिकारी | 48 |
| 3 | अ | सहायक संचालक/कोषागार अधिकारी/सहायक अधिदान व लेखा अधिकारी | 75 |
| 4 | ब-राप | लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी | 186 |
| 5 | ब-राप | स्वीय सहाय्यक | 01 |
| 6 | ब-राप | सहायक लेखा अधिकारी/ उपकोषागार अधिकारी (उच्चश्रेणी) | 308 |
| 7 | ब-अराप | लघुलेखक (उच्चश्रेणी) | 01 |
| 8 | ब-अराप | लघुलेखक (निम्नश्रेणी) | 01 |
| 9 | क | वरिष्ठ लेखापाल | 150 |
| 10 | क | कनिष्ठ लेखापाल | 638 |
| 11 | क | लघुटंकलेखक | 01 |
| 12 | क | दूरध्वनीचालक | 00 |
| 13 | क | लिपिक टंकलेखक (लेखा लिपीक) | 170 |
| 14 | क | वाहनचालक | 02 |
| 15 | ड | बांधणीकार (मृत संवर्ग) | 00 |
| 16 | ड | दप्तरी | 32 |
| 17 | ड | नाईक | 18 |
| 18 | ड | उद्वाहन चालक | 03 |
| 19 | ड | सहायक बांधणीकार (मृत संवर्ग) | 01 |
| 20 | ड | शिपाई | 51 |
| 21 | ड | पहारेकरी (मृत संवर्ग) | 02 |
| 22 | ड | सफाईगार (मृत संवर्ग) | 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | ड | हमाल (मृत संवर्ग) | 00 |
| | | **एकूण पदे** | **1698** |